मस्ट READ

# पाच कोटींची देणगी, एस.व्ही.के.एम.चा सेवेचा वसा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे धनादेश सुपूर्द

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर** : मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे पूरात मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने संसार उघड्यावर आला आहे. अशा संकट काळात मदतीचा हात पुढे करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते मुख्यमंत्री सहायता निधीसाठी ५ कोटी रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

या ५ कोटी रुपयांच्या निधीमध्ये विलेपार्ले, मुंबई येथील एस.व्ही.के.एम. संस्थेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या एक दिवसाच्या पगाराचे १.५० कोटी रुपये आणि संस्थेच्या वतीने आर्थिक मदत देणगी स्वरूपात ३. ५० कोटी रुपये अशा एकूण ५ कोटी रुपयांचा समावेश आहे. माजीमंत्री अमरिशभाई पटेल यांनी ३ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'वर्षा' या शासकीय बंगल्यावर सदिच्छा भेट घेऊन चर्चा केली.

यावेळी त्यांनी मराठवाडा येथील पूरग्रस्त शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहायता निधीला हा धनादेश सुपूर्द केला. पूरग्रस्त शेतकरी बांधवांसाठी एस. व्ही. के.एम. संस्थेने केलेल्या या सेवाभावी मदतीबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. याप्रसंगी कुलगुरु डॉ. रमेश भट, संस्था सह-अध्यक्ष भूपेशभाई पटेल, सचिव डॉ. जे.पी.गांधी, कोषाध्यक्ष हर्षदभाई शहा, सह-सचिव शालिन दिवतिया, सह-कोषाध्यक्ष हरित चितलिया, सह-कोषाध्यक्ष जगदीश पारीख, व्यवस्थापन समिती सदस्य जगत किल्लावाला आदी मान्यवर उपस्थित होते.



मुख्यमंत्री सहायता निधीला ५ कोटी रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देतांना आमदार अमरिशभाई पटेल समवेत डावीकडून हर्षदभाई शहा, हरित चितलिया, जे.पी.गांधी, शालिन दिवतिया, जगदीश पारिख, भूपेशभाई पटेल, कुलगुरु डॉ. रमेश भट आदी.

**Publication: Lokmat**

**Edition: Dhule**